
ePaper

माजी मुख्यमंत्री मनोहर जोशी यांच्या प्रकृतीत सुधारणा



| वर्ष - 7 । अंक -47 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**आतील पानांत**

- लाठीमाराची घटना क्लेशदायक!
- पालखी सोहळ्यानिमित्त पुढील ३ दिवस वाहतुकीत बदल
- 'सीएमई' हद्दीतील सांडपाणी प्रकल्पाला संरक्षण विभागाचा 'हिरवा कंदील'!

www.mahaenews.com | मंगळवार, दि. 13 जून 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## दोन्ही पालख्या पुणे मुक्कामी! ग्यानबा तुकाराम'च्या गजरात

# दुमदुमली अवघी पुण्यनगरी!

### संत ज्ञानेश्वर महाराज अन् तुकाराम महाराजांच्या पालखीचे पुण्यात आगमन

। पिंपरी ।

महाईन्यूज । प्रतिनिधी।



**वैष्णवांचा आनंदाचा मेळा, भक्तिभावाचा सोहळा.. अर्थात संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज आणि जगद्गुरु तुकाराम महाराज यांच्या पालखीच्या दर्शनासाठी आतूर झालेल्या पुण्यनगरीतील भाविकांच्या डोळ्यांचे पारणे आज फिटले. संध्याकाळीच्या वेळी दोन्ही पालख्यांचे पुण्यनगरीत आगमने झाले आणि 'आनंदाचे डोही आनंद तरंग, आनंदची अंग आनंदाचे' अशा अनुभूतीचा प्रत्यय विठुमाऊलींच्या भक्तगणांना आली. 'ग्यानबा-तुकाराम ग्यानबा माऊली' आणि 'पुंडलिक वरदे हरी विठ्ठल'च्या गजराने अवघी पुण्यनगरी दुमदुमली.**

तीर्थक्षेत्र आळंदीवरून संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज तर आकुर्डीमार्गावरून जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या पालख्या पुण्याच्या दिशेने निघाल्या. कपाळी चंदनाचा टिळा... गळ्यात तुळशीची माळ... डोक्यावर तुळशी वृंदावन... हातात भगव्या पताका आणि टाळ-मृदंगांचा अखंड नाद... अशा भक्तीमय वातावरणात पालख्यांनी मार्गक्रमण केले. त्यांच्या स्वागतासाठी पुणेकरांनी दुतर्फा गर्दी केली होती. जागोजागी रांगोळ्या काढून रस्ते सजवण्यात आले होते. फुलांनी सजवलेले रथ दृष्टिपथास येताच नागरिक विठुनामाचा गजर करत होते. पालख्यांसमोरील दिंड्या मार्गस्थ होताना 'ग्यानबा-तुकाराम'चा जयघोष केला जात होता. पालख्यांवर पुष्पवृष्टीही करण्यात आली.

लाखोंच्या संख्येने वारकरी शहरात प्रवेश करते झाले. मात्र नेहमीप्रमाणे त्यांच्या स्वयंशिस्तीचे दर्शन घडले. दिवसभर उन्हाचा चटका कायम असला तरी भाविकांचा उत्साह तसूभरही कमी झाला नाही. काही ठिकाणी उत्स्फूर्तपणे वारकऱ्यांसह नागरिकांनी फुगड्यांचा फेर धरला.

टाळ-मृदंगांच्या तालावर ठेकाही धरला. या क्षणाची छायाचित्रे आपल्या मोबाईलमध्ये कैद करण्याचा मोह अनेकांना आवरला नाही. पालखी मार्गावर ठिकठिकाणी वारकऱ्यांचे स्वागत करणारे फलक लावण्यात आले होते. सामाजिक संस्था, मंडळे, राजकीय व्यक्ती, खासगी कार्यालयांतर्फे त्यांना खाद्यपदार्थांचे वाटप करण्यात आले.

### दोन्ही पालखी सोहळ्याचे स्वागत

संत ज्ञानेश्वर महाराज आणि जगद्गुरू संत तुकाराम महाराजांची पालखी आज पुण्यात दाखल झाली आहे. संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखीचा मुक्काम श्री पालखी विठ्ठल मंदिर (भवानी पेठ) येथे तर जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या पालखीचा मुक्काम श्री निवडुंगा विठोबा मंदिरात (नाना पेठ) येथे असणार आहे. या दोन्ही मंदिरांमध्ये जय्यत तयारी करण्यात आली असून सायंकाळी मंदिरांमध्ये पालखीचे आगमन होणार आहे. या पार्श्वभूमीवर अभिषेक आणि पादुकापूजन आणि आरतीने या दोन्ही पालखी सोहळ्याचे स्वागत करण्यात येणार आहे. त्यानंतर भाविकांना पादुकांचे दर्शन घेता येणार आहे.

दोन्ही मंदिरांमध्ये उत्सव मंडपाच्या उभारणीसह विद्युत रोषणाई आणि फुलांची सजावट करण्यात आली आहे. पालखी येण्याआधीच प्रशासनाकडून जय्यत तयारी करण्यात आली आहे. प्रशासनाकडून वारकऱ्यांच्या व्यवस्थेसह सुरक्षेपर्यंत सर्व काळजी घेण्याच्या दृष्टीने प्रशासनाने तयारी केली आहे.

त्याबरोबरच पालखी सोहळ्यानिमित्त पुण्यातील काही ठिकाणी वाहतूक व्यवस्थेत देखील बदल करण्यात आलेले आहेत.

दरम्यान, या बरोबरच पालखी जाणाऱ्या मार्गांवर सीसीटीव्ही कॅमेरे आणि ड्रोन कॅमेऱ्यांद्वारे लक्ष ठेवण्यात येणार आहे. संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराजांची पालखी आज पुण्यात मुक्कामी असल्याने त्यासाठी पुणेकरही सज्ज आहेत.

## अन्नपाण्याविणा पारधी समाजाच्या नागरिकांना पोलिसांनी डांबून ठेवले

**» आषाढी वारीला यावर्षी पोलिसांमुळे पहिल्याच दिवशी रविवारी (ता.११) आळंदीत गालबोट लागले. पोलिसांनी लाठीमार केल्याचा दावा काही तरुण वारकऱ्यांनी केला. तर त्यावर फक्त झटापट झाल्याचे पोलिसांनी सांगितले. दरम्यान, हा वाद सुरु असतानाच आळंदी पोलिसांनी शंभर ते दीडशे महिला, मुले आणि पारधी समाजाच्या काही नागरिकांना रविवारी बेकायदेशीरपणे अन्नपाण्याविना डांबून ठेवल्याचा दुसरा खळबळजनक आरोप करण्यात आला आहे. डांबून ठेवलेल्यामध्ये महिला आणि मुले असल्याकडे त्यांनी लक्ष वेधले. तर, वारीच्या पार्श्वभूमीवरील ही प्रतिबंधक उपाययोजना होती. आषाढी वारी सोहळ्यात सोनसाखळीचोरी (चेनस्नॅचिंग) आणि पाकिटमारीसारखे गुन्हे होऊ नयेत म्हणून या ४८ संशयितांना ताब्यात घेतले होते, असा खुलासा आळंदी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील गोडसे यांनी यावर आज केला. सुर्यास्तानंतर महिलांना सोडून देण्यात आले, तर तिघांवर प्रतिबंधक कारवाई करण्यात आली असे त्यांनी 'सरकारनामा'ला सांगितले. सीसीटीव्ही फूटेज पाहून ही कारवाई करण्यात आली. त्यामुळे यावेळी आळंदीत वारी सोहळ्यात चेनस्नॅचिंग व पाकिटमारीच्या गुन्ह्यांना आळा बसल्याचा दावा त्यांनी केला. दरम्यान, पारधी समाजातील 127 ते 150 स्त्रिया, मुले व पुरुषांना वारी आहे, म्हणून आळंदी पोलीस स्टेशनमध्ये सकाळपासून डांबून ठेवण्यात आल्याचे समजताच ॲड. सरोदे यांनी काल फेसबुक पोस्ट करीत कोणत्या कायद्यानुसार पारधी समाजातील व्यक्तींना ताब्यात घेतले आहे.**

# लाठीमाराची घटना क्लेशदायक!

## विरोधीपक्ष नेते अजित पवार यांनी व्यक्त केला संताप, सखोल चौकशी करण्याची मागणी

। आळंदी, पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली पालखीच्या आळंदीहून प्रस्थान सोहळ्यावेळी वारकरी बांधवांवर झालेल्या पोलीस लाठीमाराची घटना क्लेशदायक आहे. महाराष्ट्राच्या संत, भक्तिपरंपरेचं वैभव असलेल्या पंढरपूर वारीच्या इतिहासात असं यापूर्वी घडलं नव्हतं.सोहळ्याचं योग्य नियोजन करुन हा प्रसंग टाळता आला असता,विरोधीपक्ष नेते अजित पवार यांनी सातान्यात संताप व्यक्त केला.लाठीचार्ज घटनेची सखोल चौकशी करण्याची केली मागणी त्यांनी केली.**



संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली पालखीच्या आळंदीहून प्रस्थान सोहळ्यावेळी वारकरी बांधवांवर झालेल्या पोलीस लाठीमाराची घटना क्लेशदायक आहे.

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली पालखीच्या आळंदीहून प्रस्थान सोहळ्यावेळी वारकरी बांधवांवर झालेल्या पोलीस लाठीमाराची घटना क्लेशदायक आहे. महाराष्ट्राच्या संत, भक्तिपरंपरेचं वैभव असलेल्या पंढरपूर वारीच्या इतिहासात असं यापूर्वी घडलं नव्हतं. आजची घटना मनाला दुःख देणारी आहे. सोहळ्याचं योग्य नियोजन करुन हा प्रसंग टाळता आला असता, परंतु तसं घडलं नाही. वारकऱ्यांवरील पोलीस लाठीमाराचा आणि लाठीमार करणाऱ्या सरकारचा मी तीव्र शब्दात निषेध करतो अस अजित पवार म्हणाले.

महाराष्ट्राला पंढरपूरच्या आषाढी वारीची गौरवशाली परंपरा आहे. आषाढी वारी आणि आळंदीहून निघणारी संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांची पालखी हे आपल्या महाराष्ट्राच्या अध्यात्म, भक्ती परंपरेचं वैभव आहे. दरवर्षी वारीसाठी हजारो वारकरी आळंदीत येतात.

वारी आणि प्रस्थान सोहळ्याचं योग्य नियोजनही केलं जातं. वारकरीही या नियोजनाला सहकार्य करत असतात. परंतु यंदा कुठेतरी चूक घडलेली दिसत आहे. प्रशासनाच्या गैरव्यवस्थापनामुळे हे घडल्याचं दिसत आहे. ही संपूर्ण घटना दुःखदायक, तशीच मनाला चीड आणणारी आहे. अशी घटना यापुढे घडू नये, यासाठी पूर्ण काळजी घेण्यात यावी. कुठल्याही आध्यात्मिक कार्यात आणि पंढरपूर वारीसारख्या सोहळ्यात सहभागी होताना, सर्वांनी राजकीय हेतू बाजूला ठेवावा. ईश्वरभक्ती आणि वारकऱ्यांची सेवा हाच हेतू मनात ठेवून वारीत सहभागी व्हावं, असं आवाहन विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी केले आहे.

### आळंदीत लाठीमार झालेला नाही, तर किरकोळ झटापट;

» आळंदीत लाठीमार झालेला नाही, किरकोळ झटापट झाल्याचा खुलासा पिंपरी-चिंचवडचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी केला आहे.पालखी प्रस्थान सोहळा हा दरवर्षी आयोजित होतो. आजही मानाच्या ५६ पालख्या आल्या होत्या. गेल्यावर्षी चेंगराचेंगरीची स्थिती निर्माण झाली होती आणि त्यावेळी काही महिला सुद्धा जखमी झाल्या होत्या. त्यामुळे यावर्षी प्रधान जिल्हा न्यायाधीश, धर्मादाय आयुक्त, मंदिर प्रमुख विश्वस्त यांच्यासोबत ३ वेळा बैठका घेऊन गेल्यावर्षीसारखी परिस्थिती निर्माण होऊ नये, म्हणून प्रत्येक मानाच्या पालखीतील प्रत्येकी ७५ जणांना प्रवेश देण्याचा निर्णय पूर्वीच घेण्यात आला आणि तसे नियोजन सुद्धा करण्यात आलेमानाच्या दिंडीप्रमुखांनी सुद्धा तो मान्य केला. त्यानुसार पासेस वितरित करण्यात आले होते. मुख्य म्हणजे सर्व मानाच्या दिंडी प्रत्येकी ७५ जणांनाच पाठवित होते. मात्र आज अचानक काही स्थानिक युवकांनी मध्ये घुसण्याचा प्रयत्न केला. मंदिर विश्वस्त आणि चोपदार सुद्धा त्यांना समजावण्यासाठी आले. पण ते युवक ऐकत नव्हते. बॅरिकेड तोडून त्यांनी आत प्रवेश करण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी रोखण्याचा प्रयत्न केला तेव्हा त्या स्थानिकांशी केवळ किरकोळ झटापट झाली, पोलिसांनी लाठीचार्ज किंवा बळाचा वापर केलेला नाही. त्यामुळे लाठीचार्ज केला, हे म्हणणे खोटे आहे. सर्व वारकरी, प्रशासनाला उत्तम सहकार्य करीत आहेत. त्यामुळे महाराष्ट्राची उच्च परंपरा असलेल्या वारीला उगाच गालबोट लावण्याचा प्रयत्न कुणी करू नये, ही माझी नम्र विनंती आहे. असे पोलीस आयुक्त चौबे यांनी सांगितले.

---

# जी-२० परिषदेसाठी आलेल्या परदेशी पाहुण्यांनी अनुभवला पालखी सोहळा!

## महाराष्ट्राची समृद्ध सांस्कृतिक परंपरा 'याची देही याची डोळा' अनुभवली

। पुणे । महाईन्यूज

**ऑनलाइन जी-२० 'डिजिटल अर्थव्यवस्था कार्यगट' बैठकीसाठी पुण्यात आलेल्या परदेशी पाहुण्यांनी पालखी सोहळ्याला हजेरी लावत महाराष्ट्राची समृद्ध सांस्कृतिक परंपरा 'याची देही याची डोळा' अनुभवली.तसेच काही प्रतिनिधींनी श्री संत तुकाराम महाराज पालखीचे दर्शन घेतले. जी-२० 'डिजिटल अर्थव्यवस्था कार्यगट' बैठकीसाठी पुण्यात आलेल्या परदेशी पाहुण्यांनी पालखी सोहळ्याला हजेरी लावत महाराष्ट्राची समृद्ध सांस्कृतिक परंपरा 'याची देही याची डोळा' अनुभवली.**



पालकमंत्री चंदकांत पाटील यांच्या उपस्थितीत संत तुकाराम महाराज पादुका मंदिरजवळ फर्ग्युसन महाविद्यालय प्रवेशद्वार येथे जी-२० प्रतिनिधींसाठी पालखी सोहळा अनुभवण्यासाठी मंडप उभारून प्रशासनाच्या आणि पुणे महानगर पालिकेच्यने व्यवस्था केली होती. पाटील यांनी प्रतिनिधींचे स्वागत केले. या वेळी पोलीस आयुक्त रितेश कुमार, पुणे महानगरपालिका आयुक्त विक्रम कुमार, जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख, पोलीस सहआयुक्त संदीप कर्णिक, मनपा अतिरिक्त आयुक्त विकास ढाकणे आदी उपस्थित होते. ढोल ताशाच्या गजरात आणि तुळशीमाळा, वारकरी उपरणे, टोपी घालून प्रतिनिधींचे स्वागत करण्यात आले.

पालखी रस्त्यावरून दिंड्यांचे आगमन होऊ लागले. हाती भगव्या पताका, महिला वारकऱ्यांच्या डोक्यावर तुळशीची रोपे, कपाळाला टिळा, टाळ, मृदंग, वीणा वादनात, 'राम कृष्ण हरी', 'ज्ञानोबा माऊली तुकाराम' जयघोषात, अभंग गायनात, फुगडी, नर्तनात दंग वारकरी पाहून प्रतिनिधी वेगळ्याच अनुभवात दंग झाले. या वेळी काही प्रतिनिधींनी वारकऱ्यांकडून कपाळाला टिळा लावून घेतला.

ढोल ताशाच्या तालावर काही प्रतिनिधी नर्तनात दंग झाले. काही प्रतिनिधींनी उत्साहाने वारकऱ्यांसोबत फुगडीचा फेर धरला. महिला प्रतिनिधींनी डोक्यावर तुळशीची रोपे घेतली. सर्वांनी मोबाईलमध्ये वारीची छायाचित्रे काढली.

प्रतिनिधींनी वारकऱ्यांना भारतीय पद्धतीने नमस्कार केला. तत्पूर्वी केशव शंखनाद पथकाद्वारे करण्यात आलेल्या वैशिष्ट्यपूर्ण शंखनादाचा तसेच ढोल पथकाच्या ढोल वादनाने वातावरणात जोश आणला.

### पुण्यात जी-20 परिषद

» पुणे : जी २० देशांतील उद्याचे नेतृत्व करणाऱ्या शहरांना सर्वतोपरी स्वयंपूर्ण बनवण्याच्या उद्देशाने विचारमंथन आणि कृती करण्याचे ध्येय डोळ्यांसमोर ठेवून उद्यापासून जी-२० परिषदेला सुरुवात होत आहे. भारतासह ऑस्ट्रेलिया आणि ब्राझिल यांच्यातर्फे या परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. केंद्रीय अर्थ मंत्रालयातील आर्थिक व्यवहार विभागाचे सहसचिव सोलोमोन आरोकीयाराज यांनी रविवारी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. भारतासह ऑस्ट्रेलिया आणि ब्राझिल यांच्यातर्फे या परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. केंद्रीय अर्थ मंत्रालयातील आर्थिक व्यवहार विभागाचे सहसचिव सोलोमोन आरोकीयाराज यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

# आषाढी वारी: पिंपरी-चिंचवड भाजपातर्फे वारकऱ्यांची सेवा!

## ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखी सोहळ्याचे स्वागत : आ. महेश लांडगे यांची उपस्थिती

। पिंपरी ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**हरीनामाचा संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज आषाढीवारी पालखी सोहळ्यानिमित्त राज्यभरातून आलेल्या वारकऱ्यांचे दिघी मॅगझीन चौकात भारतीय जनता पार्टीच्या वतीने भक्तीमय वातावरणात स्वागत करण्यात आले.**





उद्योगनगरी पिंपरी-चिंचवड शहरात सकाळी नऊ वाजताच्या सुमारास संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखी सोहळ्याचे आगमन झाले. यावेळी आमदार लांडगे यांनी काही अंतर पालखी रथाचे सारथ्यदेखील केले. यावेळी कापडी पिशवी, खाऊ वाटप, छत्री वाटप, रेनकोट वाटप, पाणी बॉटल वाटप करण्यात आले. अत्यंत भक्तिमय वातावरणात पालखीला निरोप देण्यात आला.

पालखी सोहळ्यात टाळ-मृदंगाचा नाद, हाती घेतलेली एकतारी वीणा आणि चिपळ्या यांच्या सुरांवर 'ज्ञानोबा माउली तुकाराम'चा होणारा जयघोष.. डोईवर तुळशी वृंदावन आणि मुखी विठ्ठलनामाचा गजर करीत मार्गक्रमण करणाऱ्या महिला.. कधी कडक ऊन तर कधी ढगाळ हवामानामुळे आलेली सावली अशा वातावरणात तसूभरही कमी न झालेला उत्साह.. विठ्ठलाच्या दर्शनाची आस मनी घेऊन निघालेल्या संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखी रथाचे स्वागत पिंपरी-चिंचवडकरांनी मनोभावे केले.

> श्रीक्षेत्र पंढरपूर येथील अवघ्या महाराष्ट्राचे दैवत श्री. विठूमाऊलीच्या दर्शनाची ओढ असलेले वारकरी आणि विठूमाऊलीच्या देव-भक्ताच्या नात्याचे प्रतिक म्हणजे आषाढी वारी पालखी सोहळा आहे. १३ व्या शतकात संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज भागवत धर्माची पताका खांद्यावर घेऊन, सर्वांना एकत्र घेऊन, समतेच्या तत्त्वाला धरून वारीत चालू लागले. ही परंपरा आजही अत्यंत भक्तीभावाने सुरू आहे. हा आपल्या महाराष्ट्राच्या संस्कृती, अध्यात्माचा आणि भागवत धर्माचे वैभव आहे.
> – महेश लांडगे, शहराध्यक्ष तथा आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

---

# एकांतात नेऊन मारहाण केल्याचा युवा वारकऱ्याचा आरोप

## फाटलेला खिसा, रक्ताळलेले कपडे : वारकऱ्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल

। पिंपरी । महाईन्यूज

**आळंदीत संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी प्रस्थानावेळी मंदिराच्या बाहेर काही वारकऱ्यांवर पोलिसांनी सौम्य लाठीचार्जच केल्याची घटना घडली आहे. दरम्यान, मारहाण झालेल्या एका वारकऱ्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.**





आळंदीत वारकऱ्यांवर सौम्य लाठीचार्जच नाही तर काही जणांना एकांतात नेऊन मारहाण करण्यात आल्याचा आरोप वारकऱ्याने केला आहे. या व्हिडीओची आम्ही पुष्टी करत नाही.

विशाल रावसाहेब पाटील असं या तरूणा वारकऱ्याचं नाव आहे. आळंदीमध्ये संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्यावेळी मंदिराच्या बाहेर अचानक पोलिसांच्या दिशेने बॅरिगेट्स तोडून तरूण वारकऱ्यांचा घोळका धावत आला. त्यामुळो पोलिसांनी त्यांना अडवण्यासाठी लाठीचा वापर केला. वारकरी आणि पोलिस समोरासमोर आले होते. त्यांच्यात झटापट झाली. पोलिसांनी वारकऱ्यांना धरून बाजूला करण्याचा प्रयत्न केला. काही तरूण वारकऱ्यांना एकांतात नेऊन त्यांना मारहाण केल्याचा आरोप विशाल पाटील याने केला आहे.

वारकऱ्यांवर लाठीमार आणि म्हणे हे हिंदुत्ववादी सरकार ...वारी ही महाराष्ट्राला लाभलेली शेकडो वर्षांची पवित्र परंपरा... एवढ्या वर्षात जे घडलं नाही ते या सरकारने केलं. वारीत आलेल्या वारकऱ्यांवर झालेला लाठीहल्ला हा अतिशय निंदनीय प्रकार आहे. याप्रकरणात जे दोषी आहेत त्यांच्यावर तातडीने कारवाई होईल ही अपेक्षा! अशा प्रतिक्रिया समाजमाध्यमांद्वारे उमटत आहेत.

> मी जोग महाराज संस्थेचा विद्यार्थी आहे. आमचं म्हणणं होतं की आम्हाला प्रस्थान सोहळ्याला सोडा, ते दरवर्षी सोडतात. पण, अचानक ठरलं की आम्हाला आत सोडायला नाही. आम्हा चार विद्यार्थांना वीस पोलिसांनी मारहाण केली. एकांतात घरात नेऊन मारलं आहे. आमच्यावर हात उचलला. भविष्यात इतर वारकऱ्यांवर हात उचलू शकतात. पोलिसांना मारहाण का? केली या प्रश्नाचे उत्तर त्यांनी द्यावं.
> - विशाल पाटील, वारकरी

# काही लोकांना तरी अद्दल घडवा!



भूमिका
निलेश दुटाळ
91- 87668 40811

**देशातील इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रात कायदा व सुव्यवस्था आणि प्रशासन चांगले आहे याचा महाराष्ट्रीयन व्यक्तिला नेहमीच अभिमान वाटत आला आहे. जो कधीतरी राज्याबाहेर जाऊन चार दिवस राहून आला त्याला हा फरक नक्कीच कळेल मात्र एवढ्यावर समाधान मानून चालणार नाही.**

आपण ज्या महाराष्ट्राला कायदा सुव्यवस्था आणि प्रशासनाबाबत एवढे चांगले म्हणत असू तर लक्षात घ्या इतर राज्यात याच व्यवस्थांची काय वाट लागली असेल ? बिहार आणि उत्तर प्रदेशात गुंड आणि बाहुबली आजही कायद्याला बुटाच्या ठोकरीवर ठेवत असतात. गुन्हेगारीत अजूनही या राज्याचा कुणी हात पकडत नाही. अपहरण,बलात्कार आणि खून कोणाच्याही सत्तेत कमी होताना दिसत नाहीत. सगळ्याच राजकीय नेत्यांनी समाजकंटक पदरी पोसलेले असतात त्या तुलनेत आपल्या राज्यात किमान उघडपणे असे करताना कुणी दिसत नाही हेच काय ते समाधान. आपल्या राज्यातली मोठी शहरे मात्र त्या "क्राईम सिटी "चे अनुकरण करू पाहत आहेत.

पैश्यातून सत्ता आणि सत्तेतून पैसा हे समीकरण गेल्या काही दशकापासून आपल्या राज्यात प्रभावी बनत चालले आहे त्यामुळे मंत्रिपदाची झूल अंगावर पांघरलेल्या अनेकांनी कायदा आणि प्रशासनाला वाटेल तसे वाकवण्यात तरबेज असणारी अधिकारी मंडळी महत्वाच्या जागांवर बसवायला सुरुवात केली आहे. सनदी पासून तर सामान्य अधिकाऱ्यांपर्यंत अनेक अधिकारी शासनाचे काम करताहेत असा आभास लोकांना निर्माण होतो प्रत्यक्षात हे अधिकारी राजकीय



धन्याची चाकरी करीत असतात हे अनेक प्रकरणावरून लक्षात आले आहे. मंत्रालय असो की महापालिका कोणता अधिकारी रात्री कोणत्या नेत्याच्या सेवेत हजर असेल हे सांगता येणार नाही अशी स्थिती झाली आहे. त्याचा परिणाम कायद्याची,नियमांची अमलबजावणी न करण्यात होऊन कुणाला तरी फेवर करण्यात होताना दिसत आहे. अमर्याद सत्तेसाठी पोसलेल्या टोळ्यांचे हितसंवर्धन करताना कायदा वाकवला जात आहे.

मोठ्या शहरातील सगळे वाईट धंदे आपल्या मुठीत ठेवणारी गुंड,पुंड मंडळी आणि बेईमान बिल्डर गेल्या काही वर्षात विविध राजकीय पक्षात स्थिरावले आहेत ,त्यांना सर्वाथाने संरक्षण देण्याचे कार्य सत्ताधारी करीत असतो त्यामुळे आपला पाठीराखा सत्तेत असेपर्यंत काहीही वाकडे होणार नाही याची त्यांना खात्री असल्याने कायदा आणि वचक त्यांच्या पुढ्यात लाचार झालेला दिसतो. पोलीस आणि पत्रकार भेटवस्तूंची नियमित रतीब सुरु असल्यामुळे गुन्हेगार सोडून इतरांना कचाट्यात पकडत आहेत. शासनाच्या सगळ्या योजनांची अंमलबजावणी आपल्याच कार्यकर्त्यांने केली पाहिजे याचा नेत्यांचे अट्टहास वाढल्याने सगळ्या क्षेत्रात त्याचे परिणाम महिला,मुली आणि सामान्य माणसांना भोगावे लागत आहेत. राजकीय पक्षाशी संबंधित गरजूंची कामे थांबत नाहीत आणि ज्याला कुणीच वाली नाही त्याचे कुठेच काम होत नाही अशी अवस्था आपल्या राज्यात झाली आहे.

परवा मुंबईत सरकारी वसतिगृहात अकोल्याच्या ज्या मुलीवर बलात्कार झाला त्या वसतिगृहाची अवस्था अतिशय बकाल आहे. सगळ्याच सरकारी कामांची अवस्था दाखविणारे हे प्रातिनिधिक चित्र आहे. सरकारच्या सगळ्या खात्याची वसतिगृहे आणि त्यात राहणारे नव्हे कसेबसे दिवस काढणारे विद्यार्थी यांची भयावह स्थिती बघायला मंत्री,अधिकारी किंवा आमदारांना जीवात फुरसद नाही. मुलींच्या वसतिगृहात विविध ठेकेदारांना असलेले प्रवेश आणि त्यातून गरीब घरातल्या गरजू मुलींचे शोषण कुणालाही बघवत नाही कारण त्याचे लाभार्थी सगळ्या राजकीय पक्षात विभागलेले आहेत. सरकार कुणाचेही येवो काही ठेकेदार वर्षानुवर्षे तेच असतात या मोनोपलीतून कुणीच आपले काही वाकडे करू शकत नाही असा मज यायला लागतो त्याचे परिणाम पाठीशी कुणीही नसणाऱ्या गरीब घटकाला भोगावे लागतात. या निमित्याने सगळ्या वसतीगृहाचा आढावा घेण्याचे नेहमीचे नाटक वठवल्या जाईल आणि त्याची धग शांत झाल्यावर पुन्हा हेच लोक शिरजोर होतील.

कायदा आणि पोलिसांचा अजिबात धाक ज्यांना नसतोअसे नराधम कोणतेही कृत्य करायला मागेपुढे बघत नसतात,साधय राज्यात अशांचे प्रमाण वाढायला लागले आहे. शासनाने स्त्री अत्याचाराच्या खटल्यांचा तात्काळ निपटारा करण्यासाठी जलदगती न्यायालयांचा वापर करून अतिशय निर्दयपणे स्त्रिया,मुलींच्या देहाचे लचके तोडणाऱ्या या मानवी श्वापदांना फासावर लटकविले पाहिजे.

न्यायालयात आधीच लाखो खटले प्रलंबित असताना आपण या दीर्घकालीन प्रक्रियेतून हमखास बाहेर पडू असा फाजील आत्मविश्वास अशा लोकांना असतो त्याला जबरदस्त धडा यातून शिकवला जाईल. कायदे कितीही कडक आणि कठोर केले तरी राबवणारी आणि या प्रकरणांची तपस यंत्रणा जोवर प्रामाणिक असणार नाही तोवर पीडित मुलींना न्याय मिळणार नाही त्यासाठी काही तपास अधिकाऱ्यांना सुद्धा घरचा रस्ता दाखविण्याची तयारी प्रशासनाने ठेवायला हवी .

## संपादकीय »

### फिरवलेली आणि करपलेली

***'राष्ट्रवादी काँग्रेस'मध्ये जे काही चालले आहे; ते फार द्रष्ट्या किंवा लोकहितवादी राजकारणाचे लक्षण नसून कोत्या कौटुंबिक संघर्षाला संघटनात्मक नवरचनेचा मुलामा देण्याचे कल्हईकाम आहे.***

भारतातल्या हजारो वर्षांच्या कृषी संस्कृतीत जमिनीची आणि मालमत्तेची वाटणी हा सगळ्यांत मोठा अध्याय असतो. त्याला सामाजिक, सांस्कृतिक, कौटुंबिक आणि सांपत्तिक काठ-कंगोरे असतात. अशा वाटणीतला वाटा हे सत्तेचेही निदर्शक असते. महाभारतातले कलहशील हे सख्खे चुलत भाऊच होते. या महाभारताच्या गावठी-नागरी, सुसंस्कृत-असंस्कृत, रक्तरंजित-रक्तविहीन मिनिएचर आवृत्त्या आपण भारतीय शेकडो वर्षे काढत आलो आहोत. 'युनायटेड किंगडम'मध्ये जमिनीचे तुकडे न करता वारसाची व्यवस्था केली जाते. आपल्याकडे जमिनीच्या प्रत्येक तुकड्याचे आणखी तुकडे करीत शेवटी सगळेच अल्पभूधारक आणि नंतर भूमिहीन होतात. भारताचे राजकीय चित्र पाहिले तर अपवाद वगळता सर्व प्रादेशिक पक्ष हे कृषी संस्कृतीशी नाते सांगत एकेका घराण्याच्या मालकीचे झाले आहेत.

**हवामानवाढीला तोंड देण्यासाठी विविध उपाययोजना राबवण्यात येत आहेत. याअंतर्गतच मंदिराच्या परिसरात हरित आच्छादन वाढवण्यासाठी केरळमध्ये महत्त्वाकांक्षी योजना हाती घेण्यात आली आहे. राज्य सरकारच्या अंतर्गत येणाऱ्या पाच देवस्वम बोर्डांच्या अखत्यारीतील तीन हजार ८०० मंदिरांच्या परिसरात हा उपक्रम राबवण्यात येणार आहे.**

## मंदिरांना हरित आच्छादन

हवामानवाढीला तोंड देण्यासाठी विविध उपाययोजना राबवण्यात येत आहेत. याअंतर्गतच मंदिराच्या परिसरात हरित आच्छादन वाढवण्यासाठी केरळमध्ये महत्त्वाकांक्षी योजना हाती घेण्यात आली आहे. राज्य सरकारच्या अंतर्गत येणाऱ्या पाच देवस्वम बोर्डांच्या अखत्यारीतील तीन हजार ८०० मंदिरांच्या परिसरात हा उपक्रम राबवण्यात येणार आहे. देवळांच्या दुर्लक्षित सरोवरांचे पुनरुज्जीवन करण्याचे तसेच राज्यातील पवित्र देवरायांचे संवर्धन करण्याचे उद्दिष्टही ठेवण्यात आले आहे.

'देवांकनम चारुहरितम' नावाच्या या प्रकल्पाला पर्यावरण दिनी प्रारंभ करण्यात आला. त्रावणकोर, कोची, मलबार, गुरुवायूर आणि कुदलमनीकम या पाच देवस्वम बोर्डांअंतर्गत येणाऱ्या सर्व मंदिरांच्या परिसरात ही हिरवाई फुलवण्यात येणार आहे. केरळमधील देवस्वम बोर्डांच्या अखत्यारीतील मंदिरांच्या ताब्यात मोठ्या प्रमाणात जमीन आहे. त्यावर हे हरित आच्छादन फुलवण्यात येणार आहे. या मंदिरांच्या आवारात विविध फळझाडे आणि फुलझाडे लावण्यात येणार आहेत. त्यामुळे मंदिराच्या दैनंदिन वापरासाठी फळे, फुले उपलब्ध होऊन मंदिरे स्वयंपूर्ण होण्यास मदत होईल, असा उद्देश आहे.

त्रावणकोर देवस्वम बोर्डाने आपल्या साहाय्यक आयुक्तांना दुर्लक्षित अवस्थेत असलेल्या मंदिरांच्या सरोवरांचा



डेटा सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. अनेक भागांमध्ये मंदिराची सरोवरे हा पाण्याचा मुख्य स्रोत आहे. त्यामुळे त्यांचे नूतनीकरण आणि संवर्धन सरकारी निधीतून करण्यात येणार आहे. खासगी मालमत्तांवरील देवराया आणि सरोवरे यांचे संरक्षण, संवर्धन करणाऱ्या व्यक्तींना अनुदान देण्यासाठी 'कवूम कुलवम' नावाची योजना केरळमध्ये आधीच सुरू आहे. मंदिरे ही नेहमीच पर्यावरणस्नेही असतात आणि पूजा आणि अन्य विधींसाठी केवळ सेंद्रीय साहित्याचा वापर केला जातो. त्या अनुषंगानेच एक पाऊल पुढे टाकत हाती घेतलेली ही योजना आहे. त्यामुळे मंदिरे हे पर्यावरण रक्षणासाठीचे प्रतीक होऊ शकेल.

## ।। अभंगवाणी ।।



अड्काल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# पवारांचा वैचारिक व्हायरस संपवणार...

## पत्रकार परिषदेत गुणरत्न सदावर्तेंची जीभ घसरली!

।मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्यावर टीका करताना ज्येष्ठ वकील गुणरत्न सदावर्ते यांची जीभ घसरली आहे. त्यांनी गलिच्छ भाषेत शरद पवारांवर टीका केली आहे. महाराष्ट्रात शरद पवारांचा वैचारिक व्हायरस आम्ही संपवणार आहोत. त्यासाठी आम्ही उद्यापासून महाराष्ट्रभर सभा आणि**



पत्रकार परिषदेत गुणरत्न सदावर्ते म्हणाले, “आता हे नवीन काय आहे? म्हणे शरद पवारांना धमकी दिली आहे. पण त्यांना नेमकी धमकी कुणी दिली. शरद पवारांच्या काळातच दाऊद इब्राहिम उदयाला आला आहे. शरद पवारांचा जो वैचारिक व्हायरस आहे, तो व्हायरस आम्ही संपवणार आहोत. येणाऱ्या काही दिवसांत आम्ही महाराष्ट्रामध्ये शरद पवारांचा वैचारिक व्हायरस आणि त्यांच्या विचारांचे निर्जंतुकीकरण करण्यासाठी राज्यभर सभा आणि बैठका घेणार आहोत. ती रॅली उद्यापासून आम्ही काढणार आहोत.”

दरम्यान, गुणरत्न सदावर्ते यांच्या पत्रकार परिषदेत नथुराम गोडसेचा फोटो झळकवला आहे. विशेष म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या फोटोजवळ नथुराम गोडसेचा फोटो लावण्यात आला होता. यावेळी सदावर्ते यांनी बाबासाहेब आंबेडकरांच्या फोटोसह जवळच्या खुर्चीवर ठेवलेल्या स्वातंत्र्यवीर सावरकर आणि नथुराम गोडसेच्या फोटोही पुष्पहार अर्पण केला.

वकील गुणरत्न सदावर्ते यांनी सोमवारी घेतलेल्या पत्रकार परिषदेत महात्मा गांधी यांचा मारेकरी नथुराम गोडसेचा फोटो झळकावला आहे.

एवढंच नव्हे तर नथुराम गोडसेबरोबर न्याय झाला नव्हता, असं मोठं विधान सदावर्ते यांनी केलं आहे. सदावर्ते यांनी पत्रकार परिषदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर, शिवाजी महाराज, स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या फोटोजवळ नथुराम गोडसेचा फोटो ठेवला होता.

“मी एक वकील होतो. मी महाराष्ट्रातील विधिज्ञ म्हणून मोठे खटले दाखल केले. त्याचबरोबर संविधानाचा अभ्यासक आहे. त्यामुळे तुम्हाला सांगायचं आहे की, नथुरामजी गोडसे यांच्याबाबत जी सुनावणी पार पडली. त्यांना फाशीची शिक्षा देण्यात आली. तेव्हा नथुरामजी गोडसेबरोबर न्याय झाला नव्हता. हे वेदनादायक आहे, हे मला सांगायचं आहे” असं विधान सदावर्ते यांनी पत्रकार परिषदेत केलं.

दरम्यान, सदावर्ते यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला.

महाराष्ट्रातील शरद पवारांचा वैचारिक व्हायरस संपवायचा आहे. त्यासाठी आपण उद्यापासून राज्यभर सभा आणि बैठका घेणार आहे, असंही सदावर्तेंनी जाहीर केलं.

### झळकावला नथुराम गोडसेचा फोटो

**पत्रकार परिषदेत गुणरत्न सदावर्ते म्हणाले, “आज पत्रकार परिषदेत आपल्याला एक फोटो दिसत आहे. तो फोटो नथुरामजी गोडसेंचा आहे. मला या महाराष्ट्राला, देशाला, तमाम कट्टर संघटनांना, शरद पवार आणि उद्धव ठाकरेंना विचारायचं आहे की, १०० पैकी एखाद्या मतावर नथुराम गोडसेबाबत चर्चा होऊ शकते, पण बाकी मतांवर देशातील कुणीही असहमत नाहीये. याचं कारण असं आहे की, या देशातील कुणीही माणूस माझ्या हिंदुस्तानला कापा आणि बाजुला करा, असं म्हणणारा नाही.”**

# मोसमी पाऊस संथगतीने, वाऱ्यांची वाटचाल मंदावली!

## वादळानंतर तीव्रता वाढण्याचा अंदाज

। मुंबई । महाईन्यूज

**मोसमी पाऊस तळकोकणात दाखल झाला असला, तरीही मोसमी वाऱ्यांमध्ये फारसा जोर नसल्याने त्याची पुढची वाटचाल मंदावली आहे. ‘बिपरजॉय’ चक्रीवादळ धडकून त्याची तीव्रता कमी झाल्यानंतर मुंबई आणि पुण्यात मोसमी वारे दाखल होतील आणि १७ जूननंतर पावसाचा जोर वाढेल, असा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे. मराठवाडा आणि विदर्भाला पावसासाठी आणखी प्रतीक्षा करावी लागणार आहे..**



सध्या मोसमी वाऱ्यांमध्ये जोर नाही. १७ जूननंतर मोसमी वारे दाखल होऊन मुंबई आणि पुण्यात पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे, अशी माहिती हवामान विभागाचे शास्त्रज्ञ डॉ. अनुपम कश्यपी यांनी दिली. अरबी समुद्रातील ‘बिपरजॉय’ चक्रीवादळाचा परिणाम म्हणून मुंबई, कोकण किनारपट्टी आणि गोव्यात आज, मंगळवारी ताशी ५० ते ६० किलोमीटर वेगाने वारे वाहतील, असाही अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे.

अरबी समुद्रातील अतितीव्र चक्रीवादळाचा परिणाम म्हणून गोवा, कोकण किनारपट्टी आणि मुंबईत सोमवारी ताशी सुमारे ४० ते ४५ किमोमीटर वेगाने वारे वाहत होते. मंगळवारीवाऱ्यांचा वेग ५० ते ६० किलोमीटर राहील. मुंबईसह कोकण किनारपट्टीवर हलक्या पावसाची शक्यता आहे.

मोसमी वारे सिक्कीम, बिहारपर्यंत मोसमी वाऱ्यांची आगेकूच सुरू आहे. सोमवारी तळकोकण, कर्नाटक, तमिळनाडूमध्ये मोसमी वाऱ्यांनी आगेकूच केली. बंगालच्या उपसागरातील मोसमी वाऱ्यांनी पश्चिम बंगाल, सिक्कीम आणि बिहारपर्यंत मजल मारली आहे.

# जुहू चौपाटीवर ६ मुलं बुडाली, ४ बेपत्ता, दोघांना वाचविण्यात यश

। मुंबई । महाईन्यूज



मुंबईतील जुहू चौपाटीवर फिरायला गेलेली ६ मुलं समुद्रात बुडाल्याची घटना घडलीये. यातील दोघांना वाचविण्यात यश आलंय तर चार जण बेपत्ता असल्याची प्राथमिक माहिती आहे. घटनास्थळी युद्धपातळीवर बचावकार्य सुरु असल्याची माहिती आहे.

बिपरजॉय चक्रीवादळामुळे समुद्राला उधाण आलेले असताना मोठमोठ्या लाटा उसळतायेत. अशा स्थितीत पर्यटकांनी समुद्रकिनाऱ्यांवर जाऊ नये, अशा सूचना महापालिकेने पर्यटकांना दिलेल्या होत्या. मात्र तरीही मुलं जुहू चौपाटीवर फिरण्यासाठी गेली. लाटांचा अंदाज न आल्याने मुलं समुद्रात बुडाल्याची माहिती कळतीये.

मुंबईतील जुहू चौपाटीवर फिरण्यासाठी पर्यटक मुले आलेली होती. उधाणलेल्या समुद्राला पाहून ६ मुलं समुद्रात पोहण्यासाठी उतरले. त्याचवेळी जोराची लाट आल्याने तथापि लाटांचा अंदाज न आल्याने सहा मुलं बुडाली. समुद्र किनाऱ्यावरील नागरिकांनी लगेचच धाव घेऊन दोघांना बाहेर काढलं. पण तोपर्यंत चार मुलं बुडाली. सध्या ते बेपत्ता आहेत. अग्निशमन दल आणि मुंबई पोलिसांचं पथक शोधमोहिम राबवत आहेत.

बिपरजॉय चक्रीवादळाच्या प्रभावामुळे रत्नागिरी किनाऱ्यावर सध्या लाटांचे जोरदार तांडव सुरू आहे. दोन दिवसांपूर्वी गणपतीपुळे तीर्थक्षेत्री आलेल्या अजस्त्र लाटेमुळे पर्यटकासह तेथील विक्रेत्यांना त्याचा फटका बसला होता. रविवारीसुद्धा अशीच अजस्त्र लाट आल्याने पुन्हा एकदा किनाऱ्यावर मोठे नुकसान झाले. लाटेच्या या तडाख्यातून काही पर्यटक अक्षरशः बचावले. सलग तिसऱ्यांदा हा प्रकार घडला आहे. यापूर्वीही दोनदा गणपतीपुळे मंदिराजवळ पायरीपर्यंत उधाणाचे पाणी आले होते. मात्र रविवारी आलेल्या मोठ्या लाटेने काही दुकानांचेही फार नुकसान झाले. गणपतीपुळे किनाऱ्यावर असलेल्या पर्यटकांची त्यामुळे मोठी तारांबळ उडाली, मात्र सुदैवाने कोणतीही हानी झालेली नाही. या लाटेचा एक व्हिडीओही व्हायरल झाला.

# एण्ड ऑफ द जर्नी! बिग बॉस फेम रुचिरा जाधवनं पुन्हा दिले ब्रेकअपचे संकेत?



बिग बॉस मराठी 4' मध्ये डॉ.रोहित शिंदे आणि अभिनेत्री रुचिरा जाधव हे रिअल लाईफ कपल सामिल झालं होतं. पण घरात अशा काही गोष्टी घडल्या ज्यामुळे घरातून बाहेर पडताना रुचिरा रोहितवर रागावल्याचं चित्र समोर आलं होतं. दोघांमध्ये गैरसमज झाले, प्रचंड दुरावा आला.. हे नाते पुन्हा सांधले जाईल असे वाटत असतानाच, एक मोठी धक्कादायक पोस्ट समोर आली आहे.

काही दिवसांपूर्वीच सर्व सदस्य पुन्हा एकदा घरात आले होते. यावेळी रोहित आणि रुचिरा एकत्र आले. पण दोघांमध्ये असलेली दरी सुस्पष्ट दिसली, तरीही मेघा घाडगे आणि प्रसाद जवादे यांनी त्यांचे नाते जुळवण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी दोघांनी एकमेकांना खीर भरवली. त्यावेळी हे नाते पुन्हा जुळले असे अनेकांना वाटले. पण परिस्थिती अजून सुधारलेली नाही, असे तिच्या पोस्ट वरून दिसते.

या पोस्ट मध्ये ती म्हणाली आहे, "एंड ऑफ द चाप्टर, एंड ऑफ द जर्नी, पण माझ्या आयुष्याचा इंटरव्हल पॉइंट. मला आज तुम्हा सर्वांशी एक गोष्ट शेअर करायची आहे, त्यातून तुम्हाला तुमच्या सर्व प्रश्नांची उत्तरं मिळतील. मी इंडस्ट्रीत नसताना हा शो पाहायचे. फॉलो करायचे आणि स्वतः शोमध्ये जाण्याची कल्पना करायचे.

# अन् तापशी पन्नू संतापली...

तापसी पन्नू आणि पापाजी यांचा नॉकझोक पुन्हा एकदा पाहायला मिळाला आहे. तापसी पन्नू म्हणाली की सावध राहा नाहीतर. एवढ्या छोट्या गोष्टीवरून गदारोळ सुरू झाला. पुन्हा एकदा यूजर्स तिला ट्रोल करत आहेत. लोक तिला छोटी जया बच्चन म्हणू लागले.

काही काळापूर्वी बॉलीवूड अभिनेत्री तापसी पन्नूचे पापाराझीसोबत भांडणे खूप दिसली होती. परिस्थिती अशी बनली होती की हा व्हिडिओ इंटरनेटवर खूप ट्रोल देखील झाला होता. आता पुन्हा एकदा तापसी पन्नू आणि पापाराझी आमनेसामने आले, जिथे अभिनेत्री फोटोग्राफर्सना म्हणताना ऐकली - 'सावध राहून तुम्हाला दुखापत होईल, मग तुम्ही म्हणाल की माझ्यामुळे तुम्हाला दुखापत झाली आहे.' आता तापसीचे हे वक्तव्य ऐकल्यानंतर सोशल मीडियावर प्रतिक्रिया येऊ लागल्या आहेत. काही युजर्सने तिला 'ज्युनियर जया बच्चन' म्हटले. जया बच्चन तिच्या कडक वागण्यामुळे अनेकदा ट्रोलही झाल्या आहेत. परवानगीशिवाय फोटो काढणाऱ्यांवर जया बच्चन अनेकदा संतापल्या आहेत. तापसी पन्नूने काय म्हटले तापसी पन्नू मुंबईत कॅज्युअल लूकमध्ये दिसली. त्याच्या हातात पिशव्या दिसल्या. शॉपिंग करून ती गाडीत बसते. यादरम्यान पापाराझी त्याचे फोटो काढू लागतात. तर अभिनेत्री पोज देत नाही. पण ती पापाराझीला म्हणते की तू सावधगिरीने पकडशील, मग तू म्हणशील की ती अभिनेत्यामुळे पकडली गेली. यावर एक कॅमेरापरसनही उत्तर देतो - नाही मॅडम, आम्ही असे नाही.

तापसी पन्नूचा हा व्हिडिओ पाहून यूजर्स दोन भागात विभागले गेले. काहींनी त्याचे समर्थन केले आणि बहुतेकांनी त्याला अहंकारी म्हटले. एका यूजरने लिहिले - जेव्हा हे कॅमेरे त्यांच्या आजूबाजूला दिसणे थांबवतील, तेव्हा त्यांची किंमत कळेल. तुझा खूप अभिमान आहे. तुम्ही सर्वांना एकाच तराजूत तोलू शकत नाही.



# 'सपना चौधरी सोबत माझी तुलना...'



गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्रात एका नावानं नुसता दंगा केलाय... अर्थात ते नाव आहे गौतमी पाटील. गौतमी जरी म्हणत असली की मी जो नृत्य प्रकार करते तो लावणी नाहीच मुळी, तरी तिच्या चाहत्यांनी मात्र तिला लावणीसम्राज्ञी ची उपमा जवळपास दिल्यात जमा आहे.

आज गौतमी पाटीलच्या शो ना टाळ्या,शिट्ट्या अन् गर्दीची झुंबड इतकंच घडत नाही तर इथं नाचता नाचता जीवही लोक गमावताना दिसत आहेत.

आणि याच एका कारणानं अचानक गौतमी पाटील विरोधात टोकाचा सूर निघताना दिसतोय आणि अश्लील हावभाव करत लोकांचे जीव घेण्याचा थेट आरोप करत गौतमीच्या शो वर बंदी देखील आणण्याची मागणी केली जात आहे. यावर प्रतिक्रिया देताना आता गौतमी अनेक मुलाखतीतून म्हणाताना दिसत आहे की, "मी चुकीचं काही करत नाही,मी मागे हटणार नाही आणि मी धमक्यांनाही घाबरत नाही". गौतमीची सध्या हरयाणी क्वीन सपना चौधरीसोबत तुलना होताना दिसत आहे.याविषयी एका वाहिनीच्या मुलाखतीत तिला प्रश्न विचारला असताता ती म्हणाली, "ताईसोबत माझी तुलना होतेय हे चांगलेच आहे. प्रेक्षक प्रेम दाखवत आहेत ही गोष्ट माझ्यासाठी खूप मोठी आहे".गौतमीच्या कार्यक्रमांना बहुतेक वेळा चेंगराचेंगरी होते. असेच एका कार्यक्रमात चेंगराचेंगरी झाल्यानं एका माणसाला जीव गमवावा लागला होता. तसंच, लोक शो दरम्यानं कुठे तरी झाडावर किंवा पत्र्यावर,गॅलरीवर चढतात अन् पडतात..जखमी होतात हे देखील घडताना दिसत आहे.. इतकंच काय तर स्टेजवर चढून लोक धिंगाणा घालताना दिसत आहेत. त्यामुळे गौतमी पाटीलच्या लावण्यांच्या कार्यक्रमावर बंदी आणावी अशी मागणी केली जात आहे

# पायऱ्यांवरुन पडून अभिनेत्रीचा दुर्दैवी अंत! ब्रेन डेडनंतर वयाच्या अवघ्या 29 व्या वर्षी निधन



मुंबई: लोकप्रियतेच्या शिखरावर असताना अनेक सेलिब्रिटी हे जग सोडून निघून गेल्याचं आपण पाहिलं आहे. अशीच दु:खद घटना एका २९ वर्षीय अभिनेत्रीसोबत घडली. ही अभिनेत्री शेवटचे 'स्नोड्रॉप' या हिट टेलिव्हिजन मालिकेत दिसली होती. कोरियन अभिनेत्री पार्क सू रयूनसोबत अशी घटना घडली असून तिचे वयाच्या २९ व्या वर्षी निधन झाले. या घटनेनंतर तिचे कुटुंबीय आणि चाहत्यांवर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. भारतातही कोरियन मनोरंजन विश्वाचे असंख्य चाहते आहेत. अभिनेत्रीच्या निधनानंतर सर्वच स्तरातून दु:ख व्यक्त केले जाते आहे.

दरम्यान कोरियन न्यूज पोर्टलवरील वृत्तानुसार, रयून घरी जात असताना पायऱ्यांवरून खाली पडली आणि तिला दुखापत झाली होती. स्थानिक मीडिया आउटलेट्सने दिलेल्या वृत्तानुसार, अभिनेत्री दीर्घकाळ कोणताच प्रतिसाद देत नव्हती आणि त्यानंतर तिला ब्रेन डेड घोषित केले. रयूनला वाचवण्यासाठी असंख्य प्रयत्न करूनही ११ जून रोजी तिने अखेरचा श्वास घेतला.

पार्क सू रयूनच्या अकाली निधनानंतर, SOOMPI ने दिलेल्या वृत्तानुसार, अभिनेत्रीच्या कुटुंबाने तिचे अवयवदान करण्याचा कौतुकास्पद निर्णय घेतला आहे. पार्क सू युंनच्या आईने एक निवेदनही शेअर केले असून ज्यात त्यांनी म्हटले की, 'फक्त तिचा मेंदू बेशुद्ध आहे आणि तिचे हृदय अजूनही धडधडत आहे. कोणीतरी असावं ज्याला (अवयवांची) नितांत गरज आहे. तिचे हृदय कोणाकडे तरी आहे या विचाराने तिचे आई-वडील म्हणून आम्ही यानंतर आम्ही शांतीने जगू शकू.'

# शुभमन गिल प्रकरण: रोहित शर्मा भडकला!

## आयसीसीला WTC Final नंतर सुनावलं...

| लंडन |
महाईन्यूज | वृत्तसंस्था |

**विराट शुभमन गिलला मैदानात पंचांच्या निर्णयाचा फटका बसला आणि त्यानंतर आयसीसीनेही त्याला फटकारले. गिलवर अन्याय झाला, अशी चर्चा सध्याच्या घडीला सुरु आहे. पण या प्रकरणावर आता रोहित शर्मने मौन सोडले आहे. रोहित यावेळी चांगलाच भडकलेला पाहायला मिळाला आणि त्याने रागाच्या भरात आयसीसीला चांगलेच सुनावले आहे.**



गिल वादग्रस्त पद्धतीने बाद झाला, हे निश्चित. पण त्यानंतर गिलने सोशल मीडियावर एक पोस्ट केली. यामध्ये त्याला झेल नेमका कसा पकडला गेला, हे दाखवण्यात आले होते. एका पद्धतीने गिलने पंचांवर टीका केली होती. त्यामुळे ही गोष्ट आयसीसीला खटकली आणि त्यांनी त्याच्यावर दंडाची कारवाई केली. आक्षेपार्ह पोस्ट केल्याबद्दल आयसीसीने त्याच्यावर १५ टक्के दंड आकारला आहे. त्यामुळे गिलला सामन्याच्या मानधनातून १५ टक्के रक्कम द्यावी आयसीसीला दंडाच्या रुपात द्यावी लागणार आहे. त्यामुळे आता या सर्व गोष्टीवर रोहितने आपली नाराजी व्यक्त केली आहे.

रोहित शर्माने सामना संपल्यावर यावर भाष्य केले. तो म्हणाला की, " हा प्रकार खरंच दुर्दैवी आहे. कारण जेव्हा हा झेल पाहिला जात होता, तेव्हा घाई करण्यात आली. जर थोडावेळ अजून जर बारकाईने पाहण्यात आले असते तर नेमकं काय घडलं ते समजता आले असते. माझ्यामते हा झेल पाहण्यासाठी अजून कॅमेरे हवे होते.

कॅमेराच्या वेगळ्या अँगलने हा झेल पकडला आहे की नाही, हे स्पष्ट होऊ शकले असते. पण तसे मात्र घडले नाही आणि त्याचा फटका यावेळी गिलला बसल्याचे पाहायला मिळाले." रोहितने यावेळी आयसीसी आणि पंचांवर थेट टीका करणे टाळले. पण रोहितने यावेळी कॅमेरांचा विषय काढत आयसीसीवर आपला राग काढला आहे. कारण एवढी मोठी फायनल खेळवली जात असताना आयसीसी साधे कॅमेरेही व्यवस्थित लावू शकत नाही, असे रोहितने यावेळी सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

## शुभमन गिलबरोबर मिस्ट्री गर्ल आहे कोण



भारतीय संघातील चॉकटेल बॉय शुभमन गिलचा एक फोटो सध्याच्या घडीला चांगलाच व्हायरल झाला आहे. त्यानंतर आता गिलबरोबर रोमँटीक पोझमध्ये असलेली ही सुंदरी आहे तरी कोण, याची चर्चा सुरु झाली आहे. पण ही सुंदरी नेमकी आहे तरी कोण, याची माहिती आता समोर आली आहे. गिलचे सारा तेंडुलकरबरोबर अफेअर सुरु असल्याची चर्चा होती. या दोघांची सोशल मीडियावर जोरदार चर्चा होती. त्यानंतर गिल आणि सारा अली खान यांचा एक फोटो व्हायरल झाला होता. त्यामुळे गिलचे सारा तेंडुलकर नाही तर सारा अली खानबरोबर अफेअर असल्याची चर्चा सुरु झाली. पण आता गिलचा या सुंदरीबरोबरचा फोटो चांगलाच व्हायरल झाला आहे. त्यामुळे गिल हा आता कोण्याच्या प्रेमात पडला आहे, अशी चर्चा सुरु झाली आहे. गिलबरोबर रोमँटीक पोझमध्ये असलेली ही सुंदरी आहे निहारीका एन.एम. निहारीका आपल्या नावासाठी सोशल मीडियावर चांगलीच प्रसिद्ध आहे. निहारीका ही SOCIAL MEDIA INFLUENCERS आहे. कॉलेजमध्ये असतानाच तिने आपले यु ट्युबवर चॅनेल सुरु केले होते आणि ते चांगलेच हीट ठरले होते. या चॅनेलवर ती सेलिब्रटींच्या मुलाखती घ्यायची.

## “विश्वचषक जिंकण्यापेक्षा आयपीएल जिंकणं कठीण”, सौरव गांगुलीकडून रोहित शर्माची पाठराखण



|पॅरिस|
महाईन्यूज | वृत्तसंस्था |

वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या (WTC) फायनलमध्ये भारताला ऑस्ट्रेलियाकडून २०९ धावांनी पराभव स्वीकारावा लागला आहे. लंडनच्या ओव्हल मैदानावर खेळवण्यात आलेला हा सामना जिंकण्यासाठी भारताला ४४४ धावांची गरज होती. पण पाचव्या दिवशी लंच ब्रेकपूर्वी भारताचा संपूर्ण संघ २३४ धावांवर बाद झाला. या पराभवामुळे टीम इंडियाचे आयसीसी विजेतेपदाचे स्वप्न पुन्हा भंगले. भारताने यापूर्वी २०१३ मध्ये शेवटचं ICC विजेतेपद पटकावलं होतं.

वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या (WTC) फायनलमध्ये झालेल्या पराभवानंतर भारतीय कर्णधार रोहित शर्माला नेटकऱ्यांच्या ट्रोलिंगचा सामना करावा लागला. अनेक दिग्गज खेळाडूंनीही भारतीय संघाच्या कामगिरीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

अशी एकंदरीत स्थिती असताना भारताचा माजी कर्णधार सौरव गांगुलीने रोहित शर्माची पाठराखण केली आहे. विश्वचषक जिंकण्यापेक्षा आयपीएल जिंकणं कठीण आहे, असं विधान सौरव गांगुलीनं केलं.

# विराट कोहलीपेक्षा कितीतरी पटीने जास्त आहे अमेरिकेची टेनिसपटू जेसिका पेगुलाची संपत्ती!

## टेनिसपटू फेडरर आणि नदाल यांनाही टाकले मागे

| रियाध |
महाईन्यूज | वृत्तसंस्था |

**अमेरिकेची लोकप्रिय टेनिसपटू जेसिका पेगुला सध्या चांगलीच चर्चेत आहे. फ्रेंच ओपनमध्येही ती सहभागी झाली होती. जेसिकाची एकूण संपत्ती आजच्या घडीला सर्वाधिक आहे.२८ वर्षीय जेसिका पेगुला ही मूळची न्यूयॉर्कची आहे. विशेष म्हणजे तिची एकूण संपत्ती यावेळी सर्वाधिक आहे. निव्वळ संपत्तीच्या बाबतीत तिने स्टार टेनिसपटू रॉजर फेडरर आणि राफेल नदाल यांनाही मागे टाकले. जेसिका सध्या सर्वात श्रीमंत टेनिसपटू आहे.**

अमेरिकेची जेसिका पेगुला सध्या सर्वात श्रीमंत टेनिसपटू आहे. यावेळी तिच्यापेक्षा जास्त संपत्ती दुसऱ्या कोणत्याही खेळाडूकडे नाही. पेगुलाची एकूण संपत्ती ६.७ अब्ज डॉलर आहे. भारतीय रुपयात जेसिका ५,५२,१०,३४,५०,००० कोटी रुपयांची मालकीण आहे. जेसिकाची संपत्ती रॉजर फेडरर आणि राफेल नदाल यांच्यापेक्षा जास्त आहे. नदालची एकूण संपत्ती $२२० दशलक्ष आहे. तर फेडररकडे $५५० दशलक्ष आहेत.

तिचे वडील टेरी पेगुला हे खूप मोठे अमेरिकन व्यापारी आहेत. ते जगातील ३७७ वे सर्वात श्रीमंत व्यक्ती आहेत. भारतीय क्रिकेट संघाचा स्टार खेळाडू विराट कोहलीच्या एकूण संपत्तीचीही बरीच चर्चा आहे. विशेष म्हणजे जेसिकाची संपत्ती विराटपेक्षा कितीतरी जास्त आहे. विराटची एकूण संपत्ती १२२ दशलक्ष डॉलर आहे. तर जेसिका ६.७ अब्ज डॉलरची मालकीण आहे.



जेसिका पेगुला अलीकडेच फ्रेंच ओपनच्या तिसऱ्या फेरीत एलिस मर्टेन्सकडून पराभूत झाली.